# MEDIA COVERAGE

| Publication: | Sakal | Date: | 15-9-08 |
|---|---|---|---|
| Edition: | mumbai | Place: | |

# 'ॲनिमेटेड' सीतेला जुहीचा आवाज

## रामायणा-द इपिक : चित्रपट लवकरच झळकणार

सकाळ वृत्तसेवा



जुही चावला

मुंबई : गणेश, हनुमान आणि श्रीकृष्ण आदींनंतर आता भगवान राम अन् सीता 'ॲनिमेटेड' रूपात दर्शन देणार असून प्रसिद्ध अभिनेत्री जुही चावला यात 'सीता' बनली आहे. 'रामायणा-द इपिक' नावाने हा ॲनिमेशनपट येत असून सीतेच्या व्यक्तिरेखेला जुहीने आवाज दिला आहे.

'माया एण्टरटेन्मेंट लि.'ने 'रामायणा-द इपिक' नावाचा एक ॲनिमेशनपट बनविण्याचे ठरविले आहे. पुढील वर्षी तो प्रदर्शित केला जाणार आहे. रामाच्या व्यक्तिरेखेसाठी मनोज वाजपेयी, हनुमानाकरिता मुकेश ऋषी आणि रावणाकरिता आशुतोष राणा या कलाकारांनी आपापला आवाज दिला आहे. चेतन देसाई यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. रितुराज त्रिपाठी यांनी लेखन केले आहे. शारंग देव पंडित यांचे संगीत आहे. एक तास ४० मिनिटांचा हा चित्रपट अर्धाअधिक पूर्ण झाला असून लवकरच तो झळकणार आहे.

आपल्या नव्या रोलविषयी जुही म्हणते, मी माझ्या मुलांबरोबर 'बाल गणेशा' आणि 'हनुमान' हे ॲनिमेटेड चित्रपट पाहिले. त्या चित्रपटांचा दर्जा मला स्वतःला फारसा काही भावला नव्हता. त्यामुळे 'रामायणा'साठी मला जेव्हा ऑफर आली तेव्हा सर्वप्रथम मी या ॲनिमेशनपटाचा दर्जा काय आहे ते पाहिले. त्यानंतरच सीतेच्या भूमिकेला आवाज देण्याचे निश्चित केले.

आशुतोष राणा म्हणाला, लहान असताना मी 'रामलीला'मध्ये भाग घ्यायचो. तेव्हा रावण साकारायची खूप इच्छा होती. मात्र, छोट्याच भूमिका माझ्या वाट्याला यायच्या. 'मेघनाथ'पर्यंत मी मजल मारली होती. अखेर या ॲनिमेशनपटाद्वारे माझी रावण बनण्याची इच्छा पूर्ण झाली. आता एखाद्या हिंदी चित्रपटात रावणाची भूमिका साकारायची आहे.

मुकेश ऋषी म्हणाला, आतापर्यंत मी खलनायकी भूमिका अधिक साकारल्या. मात्र हनुमानासाठी आवाज देताना मला आनंद होत आहे. लहान मुलांसाठी हा चित्रपट असल्याने एक चांगले काम माझ्या हातून घडत असल्याचा आनंद आहे.